आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

७ जानेवारी २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा केंद्र सरकारचा अंदाज

- पुणे महापालिकेसाठी भाजपाचा, मुंबईसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचा आणि कोल्हापूरसाठी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध

- अंबरनाथ आणि अकोट नगरपरिषदेतल्या युतीवरुन भाजपा आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते स्थानिक कार्यकर्त्यांवर नाराज

- जीवघेण्या हल्ल्यानंतर प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा उपचारादरम्यान मृत्यू

**आणि**

- राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जाच्या अटींचं राज्यातल्या ३० पैकी २४ साखर कारखान्यांकडून उल्लंघन

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा अंदाज केंद्र सरकारनं वर्तवला आहे. यापूर्वी हा दर साडे ६ टक्के राहील असा अंदाज वर्तवण्यात आला होता.

चालू आर्थिक वर्षात देशाचं ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न २०१ लाख कोटी रुपयांहून अधिक होण्याची शक्यता आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात हे उत्पन्न १८८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा सरकारचा अंदाज आहे.

उत्पादन आणि बांधकाम क्षेत्रातल्या वाढीमुळं आर्थिक वृद्धीदर ७ टक्क्यांच्या पलीकडे जाऊ शकतो असं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं म्हटलं आहे.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
७ जानेवारी २०२६ - बुधवार

**<><><><><>**

महापालिका निवडणुकीसाठीचं मतदान अवघा आठवडाभरावर आल्यानं विविध राजकीय पक्षांनी जाहीरनामे प्रसिद्ध करायला वेग घेतला आहे. याशिवाय मोठ्या प्रमाणात प्रचारसभा, आरोप-प्रत्यारोप होत आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड व्हाइस कास्ट

*पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा आज प्रसिद्ध झाला. ५००चौरस फुटापेक्षा कमी आकाराचं घर असणाऱ्या, आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना मिळकत कर माफ करणार, ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना PMPML चा मोफत प्रवास, तीस वर्षांवरील प्रत्येक पुणेकराची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी, महिलांना सवलतीच्या दरात मेट्रो आणि पीएमपी बस प्रवास, इत्यादि आश्वासनं या संकल्पपत्रात देण्यात आली आहेत. येत्या ५ वर्षांत १२ कार्यक्रम राबवण्याचा संकल्प असल्याची माहितीही केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी दिली.*

*पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या नागरिकांच्या रोजच्या समस्या दूर करण्यासाठी पाच अलार्म, एक काम मोहीम राबवणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. खराब रस्ते आणि वाहतूक कोंडी, कचऱ्याची समस्या, पाणीटंचाई, अपुरी आरोग्यव्यवस्था आणि पर्यावरणाचा ऱ्हास या पाच गोष्टींचा यात समावेश असेल.*

*मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. मुंबईतल्या पायाभूत सुविधांचा विकास, घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवणे, जुन्या चाळी आणि झोपडपट्टीमध्ये मोफत पाणी पुरवठा, एक लाख नव्या घरांची निर्मिती आणि एसआरए योजनेची वेगवान अंमलबजावणी करणार, ७०० वर्ग फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी अशी आश्वासनं राष्ट्रवादी काँग्रेसने दिली आहेत.*

*कोल्हापुरात आज काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी प्रसिद्ध केला. तातडीची दहा हजार रुपयांची वैद्यकीय मदत, स्मार्ट वाहतूक आणि पार्किंगची सोय, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल, प्रभावी कचरा व्यवस्थापन, पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रण, अंबाबाई तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह "कोल्हापुरी चप्पल"ची पारंपरिक ओळख जपण्यावर भर आणि विमानतळाचं नामकरण छत्रपती राजाराम महाराज यांच्या नावावर करण्याचा प्रस्तावाचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.*

*महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज अमरावतीमधे प्रचारसभा घेतली. अमरावतीमधला कचरा प्रकल्प पूर्णत्वास नेणार, भूमिगत वीज वाहिन्यांचं जाळं निर्माण करणार, शुद्ध पिण्याचं पाणी आणि रस्ते उपलब्ध करून देणार असं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.*

*नागपूर महानगरपालिकेत भाजपा सत्तेत आल्यापासून नागपूर मेट्रोला पावणेदोन कोटी हजार रुपयांचा तोटा झाला आहे. त्यामुळं नागरिकांनी भाजपा सोडून कुठल्याही पक्षाला मतदान करावं असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी नागपुरात केलं. या निवडणुकीत दबावतंत्र मोठ्या प्रमाणात वापरलं जात असून प्रादेशिक पक्षांच्या अस्तित्वालाच भाजपा आव्हान देत आहे असा आरोपही त्यांनी केला.*

*दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपाने तयार केलेल्या प्रचारगीताला निवडणूक आयोगानं परवानगी नाकारली आहे. या गीतात 'भगवा' या शब्दाचा उपयोग करण्यात आला होता. धार्मिक प्रतीकांचा राजकीय प्रचारात वापर करण्यास आचारसंहितेनुसार बंदी आहे, त्यामुळे हा शब्दप्रयोग नियमांच्या विरोधात असल्याचं आयोगानं नमूद केलं आहे.*

**<><><><><>**

अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपानं काँग्रेसची तर अकोट नगरपरिषदेत भाजपानं MIM शी युती केली आहे. याप्रकरणी भाजपा आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- -- होल्ड व्हाइस कास्ट ---**

*(ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथल्या नगरपरिषदेत शिवसेनेला डावलून भाजपानं, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर अंबरनाथ विकास आघाडी तयार केली आहे. अकोला जिल्ह्यात अकोट इथं एमआयएम बरोबर समझोता केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली असून कोणत्याही परिस्थितीत हे समझोते खपवून घेणार नाही असं स्पष्ट केलं आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या प्रकरणी अकोटचे आमदार प्रकाश भारसाखळे यांच्याकडून खुलासा मागवला आहे. भाजपाच्या स्थानिक नेत्यांचा हा निर्णय चुकीचा असल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली आहे.*

*काँग्रेसनं अंबरनाथमधल्या पक्षाच्या सर्व नगरसेवकांना पक्षातून निलंबित केलं आहे. कार्यकारिणी बरखास्त करण्याचा तसंच कार्यकारिणीच्या अध्यक्षांना निलंबित करण्याचा आदेश प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. भाजपासोबतची युती ही चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर काल झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अकोला जिल्ह्यात अकोट तालुक्यात मोहाळा या गावात मशिदीत नमाज अदा करुन बाहेर पडणाऱ्या हिदायत पटेलांवर हल्लेखोराने धारदार शस्त्राने हल्ला केला होता. राजकीय आणि कौटुंबिक वादातून ही हत्या झाल्याचा आरोप हिदायत पटेल यांच्या कुटुंबियांनी केला आहे.

हल्लेखोराला जवळच्या पणज गावात गावकऱ्यांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. राज्यात पूर्णवेळ गृहमंत्री नसल्यानं ही हत्या झाल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या २४ साखर कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेल्या कर्जाचा उपयोग इतर कामांसाठी केल्याचं महामंडळाला आढळून आलं आहे. राज्यातल्या एकूण ३० कारखान्यांना महामंडळानं ४ हजार ३५५ कोटी रुपयांच्या कर्जांचं वाटप केलं आहे. त्यांनी कर्जाचा वापर कशासाठी केला याची पाहणी जून आणि जुलै महिन्यात केली. त्यात २१ साखर कारखान्यांनी कर्ज वाटपाच्या नियमांचं गंभीर उल्लंघन केल्याचं तर ३ कारखान्यांनी काही प्रमाणात उल्लंघन केल्याचं महामंडळाला लक्षात आलं. या

कारखान्यांवर पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य सरकारनं साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. कर्जाचा गैरवापर झाला आहे का, याची तपासणी करुन त्यांच्यावर करायच्या कारवाईची शिफारस करण्यासाठी सरकारनं या समितीला २ आठवड्यांची मुदत दिली आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात आंबेगन शिवारात झालेल्या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर सहा महिला जखमी झाल्या. जखमींपैकी चार महिलांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी विकसित भारत जीरामजी योजना केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत आहे. या योजनेविषयी धाराशिव जिल्ह्यातले शेतकरी श्रीकांत जोशी यांनी आकाशवाणीकडे प्रतिक्रिया दिली.

**- -होल्ड - बाईट - श्रीकांत जोशी - -**

**<><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट तर मराठवाड्यात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी तापमान गोंदिया इथं ७ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**